# आधुनिक राजनीती व अर्थनीतीच्या परिप्रेक्ष्यातून शिवकालीन अर्थनीती व व्यापारनीती : एक समीक्षा

**डॉ. प्रा. सुनीता सरायकर**
विभागप्रमुख इतिहास विभाग,
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था, नागपूर

इतिहास हे शास्त्र आहे. इतर शास्त्राप्रमाणे त्याचीही वाढ होत गेली पाहिजे प्रत्येक राष्ट्राला आपल्या इतिहासाची वारंवार उजळणी करणे जरूर आहे. कालमानाप्रमाणे व परिस्थितीप्रमाणे इतिहासाची मांडणी बदलत गेली तरच तिचा राष्ट्रास उपयोग होईल. असे रीयासतकार गो.स. सरदेसाई यांनी म्हटले आहे. इतिहास व वर्तमान कालीन व्यवहार हे एकमेकांशी नेहमी निगडित असतात. प्रत्येक राष्ट्रास आपल्या गतकालीन इतिहासाची अत्यंत आवश्यकता असते. ज्या ज्या वेळी राष्ट्रासमोर प्रश्न निर्माण होतात त्या त्यावेळी त्या प्रश्नास पोषक असे दाखले इतिहास पटवून देतो.

छत्रपती शिवाजी महाराजांनी महाराष्ट्रात केलेली स्वराज्य स्थापना ही हिंदुस्थानच्या इतिहासातील एक महान घटना मानली जाते. मराठ्यांचा आद्य इतिहासकार कॅप्टन जेम्स कनिंगहॅम ग्रॅट डफ आपल्या इतिहासाच्या प्रसतावनेत म्हणतो, "आम्ही भारताची सत्ता मराठ्यांच्या पासून घेतली"[2] याचा अर्थ इंग्रजांना भारतात सत्तेसाठी लढा द्यावा लागला तो मराठ्यांशी त्यामुळे मराठ्यांचा इतिहास हा प्रादेशिक न राहता भारताचा इतिहास बनला. प्रत्येक राष्ट्राचा विकास हा राष्ट्रांतर्गत व परदेशाशी होणाऱ्या व्यापारावर बहुतांशी अवलंबून असतो. हिंदुस्थानच्या प्राचीन संस्कृतीचा परिचय पुर्वेकडील व पश्चिममेकडील देशांना फार पुरातन काळापासून झाला होता. पूर्वेकडील देशांना भारतीय संस्कृतीचे आकर्षण वाटत होते तर पाश्चिमात्यांना भारत म्हणजे सुवर्णभुमि आहे असे वाटत होते. भारतात परकियांचा प्रवेश प्रथम आर्थिक कारणाने नंतर राजकीय सत्तेसाठी उत्तरेकडील भूमार्गाने व दक्षिणेकडील जलमार्गाने झाला.[3] भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर पोर्तुगीज, डच, डेन्स, इंग्रज, फ्रेंच इत्यादी मध्ययुगात आले. त्यांना भारताशी व्यापार करावयाचा होता पण भारतापासून आर्थिक लाभ प्राप्त करण्यासाठी त्यांना राजकीय सत्ता हवी होती.

मराठी सत्तेच्या उदयापुर्वी अनेक शतके महाराष्ट्राने भारताच्या इतिहासात महत्वपुर्ण योगदान दिले आहे. बौद्ध काळात अक्ष्मक व मुलक ही जनपदे गोदावरीनदी काठी होती, तर नांदेड ही नंद

साम्राज्याची उपराजधानी होती.[4] सातवान साम्राज्यात महाराष्ट्राचा प्रदेश वैभव संपन्न होता. त्यानंतर वाकाटक, चालूक्य, राष्ट्रकूट या राजघराण्याच्या काळात व यादवांच्या काळापर्यंत महाराष्ट्रात व्यापार उदीम वाढला होता.[5] परंतु इ.स. 1294 साली अल्लाउद्यीन खिलजीने देवगिरीवर (दौलताबाद) स्वारी केली तेथून महाराष्ट्रातले राजकीय स्थैर्य भंग पावले. तेराव्या शतकापासून ते सोळाव्या शतकापर्यंत महाराष्ट्रात राजकीय अस्थैर्य होते. सतराव्या शतकाच्या पुर्वाधात मोगलांचा प्रभाव महाराष्ट्रात वाढला व सततच्या संघर्षाने महाराष्ट्राची संपन्नता कमी होवू लागली. त्याचबरोबर महाराष्ट्रातील प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे महाराष्ट्रातील व्यापार थंडावला. सतराव्या शतकाच्या मध्यात महाराष्ट्रीयन लोकांना त्यांच्या अस्मितेची नव्याने जाणीव करून देणारा व विविध क्षेत्रात त्यांना नव्या वाटा दाखविणाऱ्या शिवाजीराजांचे नेतृत्व लाभले व पुन्हा महाराष्ट्राने व्यापार उद्योगाच्या क्षेत्रात दमदार पाऊले टाकलीत.

शिवाजी महाराजांनी आपले व्यापार विषयक धोरण मोठ्य धूर्तपणे आखले होते. महाराष्ट्राची पश्चिम किनारपट्टी सुमारे 710 कि.मि. च्या जवळपास इतकी आहे. शिवकाळात कोकण भागात गजबजलेली बरीच व्यापारी केंद्र होती. त्यात चौल, दाभोळ, कल्याण, भिवंडी, वेंगुर्ला, पेण, तारापूर, केळवे–माहिम, वसई, नागोठणे, श्रीवर्धन, जैतापूर, खारेपाटण इत्यादी उल्लेखनीय आहेत. चौल आणि दाभोळ ही बंदरे व्यापाराच्या दृष्टीने सुरत आणि गोव्यासारखी गजबजलेली असत.[6] दाभोळ बंदरातून मक्का व एडन या परदेशातील बंदरांशी व्यापार चालत असे.[7] राजापुरचे तांबडा समुद्र व इराणमधील बसरा येथे व्यापारी संबंध होते तर वेंगुर्ला यथून जपान, सिलोन, इराण, अरबस्थान या देशांशी आयात निर्यात व्यापार चालत असे.[8] शिवाजी महाराजांनी सागरी व्यापाराकडे अधिक लक्ष केंद्रित केले होते. शिवाजीचा आरमार स्थापनेचा व्यापार वृद्धी हा एक उद्देश होता. त्यांच्या युद्ध नौकांमध्ये मचवा, शिवार, तरांडी, पगार या नौका केवळ व्यापारी उद्देशानेच बांधल्या होत्या.[9]

राज्याच्या आर्थिक स्थैर्यासाठी सावकाराचे महत्व कसे आहे, स्वकीय आणि परकीय सावकार यामध्ये काय फरक आहे, हे महाराजांना स्पष्टपणे समजले होते. त्यानुसारच त्यांनी आपले आर्थिक धोरण आखले होते. आज्ञापत्रात म्हटले आहे, "साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रींची शोभा साहुकाराकरिता राज्य अबादान होते व न मीले ते वस्तुजात राज्यात येते राज्य श्रीमंत होते. पडीले संकट प्रसंगी पाहिजे ते कर्जताम मिलते जेणेकरून आल संकट परिहार होते. साहुकाराचे करीता साहुकारांच्या बहुमान चालवावा कोव्हे तीषई त्यावरी जलल अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा."[10] स्वकीय सावकार आणि परकीय सावकार यांतील फरक महाराजांनी स्पष्टपणे दाखविला आहे, आणि या परकीय सावकारापासून आपण सावध राहिले पाहिजे असा इशाराही दिला आहे. आज्ञापत्रात पुढे अमात्य म्हणतात, "साहुकारांमध्ये फिरंगी (पोर्तुगीज), इंग्रेज, वलंदेज (डच), फरासिस (फ्रेंच),

डिंगमारादी (डॅनिश), टोपीकार हे ही लोक सावकारी करीतात, परंतु ते वरकड सावकारासारखे नव्हते. त्यांचे खावंद प्रत्यक प्रत्यक राज्यच करितात. त्यांचे हुकमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती सावकारीस येतात. राज्य करणाऱ्यास स्थललोभ नाही ऐसे काय घडो पाहते ? तथापि या प्रांते प्रवेश करावा, राज्य वाढवावे, स्वमत प्रतिष्ठावे हा टोपीकरांचा पूर्ण अभिमान तदनुरूप स्थलो–स्थली कृतकार्यही जाले आहेत. त्याहीवरी (ही) हटी जात हातास आले स्थल मेलियाने सोडावयाचे नव्हेत." याअर्थी शिवकालीन मराठी राजनीतिज्ञांना युरोपियन व्यापाऱ्यांचे खरे अंतरंग कळाले होते. एकदा का एखादे स्थळ हाती आले तरी ते मेले तरी सोडणार नाहीत. याची पुरेपूर जाणीव शिवाजी राजांना होती. म्हणूनच परक्रीयांशी रोखीतच व्यवहार करावा स्वराज्यातील जागा देवू नये. जंजीऱ्याजवळ विदेशीयांची ये जा राहणार नाही याची काळजी घ्यावी. वखारीस जागा द्यावी लागलीच तर ती खाडीचे शेजारी किंवा समुद्रकिनारी न द्यावी नाहीतर विदेशीशक्ती मजबूत संरक्षक व्यवस्था उभारून आपल्यालाच स्पर्धक होतील हे होवू न द्यावे.[11] अशारितीने शिवाजी महाराज काळाची पाऊले ओळखून वागणारे होते. शिवाजी महाराजांनी सर्वच व्यापाऱ्यांचे हितसंबंध जोपासण्याचा प्रयत्न केला.शत्रूच्या प्रदेशातील व्यापारी पकडले गेले तरी त्यांना माफक दंड करावा अशाच सुचना दिल्या आहेत.[12] परकीयांना विनाकारण त्रास द्यावा असा शिवाजीमहाराजांचा हेतु कधीच नव्हता. परकीय व्यापारी हुशार आहेत त्यांच्या व्यापारांने देशास सधनता प्राप्त होते इ. गोष्टी मनात आणून राजांनी परकीय व्यापाऱ्यांना व्यापार करण्यास उत्तेजनच दिले.[13] इंग्रज मराठी मुलखाशी अधिक संबंधित होते. शिवाजी राजांच्या ताब्यात असलेली राजापूर, दाभोळ व केळशी ही बंदरे मुंबईच्या व्यापाऱ्याला अत्यंत आवश्यक होती.[14] इंग्रजांना मुंबई बंदराच्या विकासाकरिता मराठ्यांच्या प्रदेशावरच अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे इंग्रजांना शिवाजीशी व्यापारी संबंध निर्माण करणे आवश्यक वाटत होते. शिवाजी महाराजांनाही इंग्रजांकडून लष्करी साहित्य हवे होते. त्यामुळे मराठी सत्तेला आर्थिक दृष्टीने सबळ करण्याकरिता राष्ट्राच्या बळकटी करीता अनुकूल व्यापारी अनुशेष ही त्या काळाची राजनीती शिवाजीराजांनी अमलात आणली.[15]

स्वराज्यातील उद्योगधंदे भरभराटीला यावेत त्यांना योग्य ते संरक्षण मिळावे, परक्रीयांचा हस्तक्षेप होवू नये याबाबत शिवाजीराजे सदैव जागरूक असत.[16] त्यावेळी कोकण मिठाच्या उत्पादनाचे प्रमुख केंद्र होते. कोकणातील शेतकरी जोडधंदा म्हणून मीठ उत्पादनाचा व्यवसाय करीत असत. शेतीपेक्षा मिठागरे लोकांच्या निर्वाहाचे मुख्य साधन होते. कोकणातील मीठ देशावर व आशियातील मस्कत, इराण, बसरा, एडन, या प्रदेशात विकण्यासाठी जात असे.[17] शिवाजीराजांच्या हद्दीत तयार होणाऱ्या मिठाला पोर्तुगीजांच्या गोव्यातील मिठापासून विशेष स्पर्धा होत असे. बारदेश भागात उत्तम मिठाची पैदास होत असे आणि तेथे पैदा होणारे मीठ मराठी मुलखापेक्षा स्वस्त होते. त्यामुळे देशावरील व्यापारी मीठ खरेदीसाठी स्वराज्याचा मुलूख ओलांडून बाहेर देशात जात व तेथून

मीठ देशात आणून विकत असत. यामुळे कोकणातील मिठागरे बंद होण्याची वेळ आली मिठावरील जकातीचे उत्पन्नही कमी झाले. ही परिस्थिती लक्षात घेऊन शिवाजी राजांनी संरक्षणाचे धोरण अमलात आणले. बारदेशातून मीठ आयात करणाऱ्यांवर जबर जकात लादली. आपल्या जकात अधिकाऱ्यांना राजांनी कडक ताकीद दिली की, "संगमेश्वराहून बारदेशीचे मीठ महाग पडेल ऐसा जकातीचा तह देणे.......ये गोष्टीचा एक कसूर न करणे, ये गोष्टीत साहेबाचा फायदा आहे." अशा रितीने शिवाजी महाराजांनी सतराव्या शतकात संरक्षक व्यापार नीतीचा वापर प्रत्यक्षात करून आपल्या देशातील व्यापाऱ्याला अभय दिले. याच धोरणाला पुढे एकोणिसाव्या शतकात जर्मन अर्थशास्त्राज्ञ प्रेडिरिक लिस्ट याने संरक्षणाचे धोरण असे सिधांतरूपाने मांडले.[18] याच शतकात अमेरिकेला जागतिक व्यापार जगतात प्रवेश मिळवावयाचा असल्यामुळे मुक्त व्यापार नीतीचा पुरस्कार केला होता, पण वर्तमान काळात अमेरिकेला जागतिकी करणाच्या स्पर्धेत आपला अंतर्गत व्यापार सुरक्षित ठेवण्याकरिता संरक्षक व्यापार नीतीची कास धरावी लागत आहे. अशा रीतीने बदलत्या अर्थव्यवस्थेत प्रत्येक राष्ट्राला आपले आर्थिक हितसंबंध जोपासण्यासाठी जागतिक आर्थिक परिवर्तनाचा विचार करावाच लागतो हे दिसून येते. याचे उदाहरण शिवाजींनी सतराव्या शतकात घालून दिलेले दिसते.

स्वराज्याचे सुराज्य होण्यासाठी त्या राज्याचा आर्थिक पाया भक्कम झाला पाहिजे यासाठी शिवाजीराजांनी विशेष लक्ष पुरविले होते.[19] शिवकाळात शेतसारा दोन पद्धतीने वसूल केला जात असे. एक नख्त म्हणजे रोख पैशाच्या रूपाने आणि दुसरी गलापद्धत म्हणजे धान्याच्या रूपाने. महसूल वसुलीच्या या दोन शिरस्त्यांची कसून अंमलबजावणी करावी अशी सर्व अधिकाऱ्यांना ताकीद होती. कारण धान्यरूपाने वसुली करण्याचे काम फार जिकिरीचे असल्याने अधिकारी वर्ग सामान्यतः त्या मार्गाचा अवलंब करण्याच्या बाबतीत टाळाटाळ करीत. सरकारी हिश्याचे धान्य गोळा करून ते गोदामात रूजू करण्यापेक्षा शेतावरच त्याची चालू बाजारभावाने किंमत ठरवून अथवा त्याची विक्री करून पैशाच्या रूपाने महसूल दफ्तरी जमा करीत. शिवाजीराजांना अधिकाऱ्यांची ही कारवाई पसंत नव्हती. कारण जेथे उत्पादन होते तेथे रास्त भाव मिळणार नाही याविषयी जाण शिवाजीराजांना होती.[20] मागणी पुरवठा आणि वस्तूंचे भाव हा अर्थशास्त्रातला साधा सिधान्त महाराजांनी प्रत्यक्षात अमलात आणला होता. हा आर्थिक व्यवहार आपल्या अधिकाऱ्यांना समजावून सांगतांना महाराज एका पत्रात लिहितात, "रयतेपासून यैन जिनसाचे (धान्यरूपाने) नक्ष (रोकड–पैशाच्या रूपाने) घ्यावे असा सरकारच्या येकंदर हुकूम नाही. तेव्हा सर्वत्र धान्यरूपाने घ्यावयाचे ते रोकड रूपाने घेत जाऊ नये. यैन जिनसाचे येन जिनसच वसूल घेऊन जमा करीत जाणे, आणि मग वेळचे वेळेस अशा कौशल्याने त्याची विक्री करावी, की ज्यायोगे ती वस्तू महाग दराने विकली जाईल आणि त्यामुळे साहेबाचा

फायदा होईल."[21] अशारितीने शिवाजी महाराजांनी स्वराज्याच्या पाया मजबूत करण्या करीता कीती दूरदृष्टीने विचार केला होता ते दिसून येते.

शिवकालीन अर्थव्यवस्था शेतीवर अवलंबून होती. राज्याचा आर्थिक विकास हा शेती आणि शेतकरी यांच्या विकासाशी निगडित आहे. हे शिवाजीराजांनी जाणले होते. त्यानुसार शेतकऱ्यांना व्याजरहित कर्ज देणे, साराभरण्याबाबत सवलती देणे, ज्या कुणब्याजवळ शेत आहे पण साधने नाहीत अशांना बैल, बी–बियाणे, धान्यासाठी रोख पैसे द्यावेत अशा सुचना शिवाजीराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना दिल्या होत्या. वसुली अधिकाऱ्यांना शिवाजी राजांनी स्पष्टपणे बजावले होते की, पुढील वर्षी लगेच कर्जवसुली वाढीदिडीने नकरता फक्त मुद्दलच आणि तेही हप्त्याहप्त्याने वसूल करावे. ज्या कुणब्या जवळ धडधाकट शरीराशिवाय काहीच नसे अशांना सरकारातून पडीक जमिनीपासून बैलजोडीपर्यंत सर्वकाही देण्याची महाराजांची तयारी होती. यासाठी सुभेदाराने आपल्या प्रदेशातील प्रत्येक गावात भेट दिली पाहिजे व दुबळ्या शेतकऱ्यास साहाय्य केले पाहिजे असा राजांचा दंडक होता.[22]

शेतकऱ्यांशी वसूली अधिकाऱ्यांनी कसे वागावे यासंबधी स्पष्ट सूचना शिवाजी महाराजांनी दिलेल्या आहेत. इ.स. 1676 साली प्रभानवल्ली येथील सुभेदाराला लिहिलेल्या पत्रात महाराज लिहितात, "चोरी न करावी, इमाने इतबारे साहेब काम करावे, येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास व दुरूस वर्तण या उपरिकमाविस कारभारास लावणी संचणी उगवणी जैसी जैसी जे जे वेळेस जो करू येते ते करीत जाणे .........रयतेचा वाटा रयतेस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे, रयतेवरील काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत ऐसे बरे समजणे." अशा रितीने शिवाजीमहाराज शेतकऱ्यांना अर्थव्यवस्थेचा कणा समजत असत. शिवकाळापुर्वी शेतऱ्यांवर सारावसुली करतांना जी जुलूम जबरदस्ती होत असे त्यामुळे शेतकरी कंटाळून परागंदा होत असत, गावच्या गाव ओस पडीत असत, लागवड होत नसे हे लक्षात घेऊन शिवाजीराजांनी स्वराज्यातील वतनदारांना व अधिकाऱ्यांना बजावले होते की, "कुणबिया कुनब्याची खबर घेऊन त्याला तवानगी येती करून कीर्द करावी."[24] शिवाजींच्या या नितीचा परामर्ष घेतांना वर्तमान काळातही भारतात शेतकऱ्यांना अनेकदा जीवन मरणाचा संघर्ष करावा लागतो तेव्हा शिवाजीच्या पाऊलांवर पाऊले ठेवून शासनाने आपली धोरणे राबविली तर भारततही अर्थव्यवस्था मजबूत होण्यात मदतच होईल हे जाणवते.

आधुनिक जागतिक अर्थनीती व व्यापारनीतीचे अवलोकन केले असता शिवकाळाची आठवण झाल्याशिवाय राहात नाही. शिवाजी महाराजांची कारकीर्द संपून आज तीनशे एकतीस वर्षे पुर्ण झालेली आहेत. आज राष्ट्राराष्ट्रांमधील संबंध हे धर्म, राज्यपद्धती, वंश, भाषा अशा कोणत्याही

गोष्टीपेक्षा व्यापारी हितसंबंधावरून जास्त ठरतात असे दिसते.[25] आज आर्थिक दबावाखाली जगातील अनेक समीकरणे बदलतांना दिसतात. अमेरिकेला आशियाखंडात आपला प्रभाव ठेवण्याकरीता पाकिस्थान सारख्या राष्ट्राचा आधार द्यावा लागतो तर जपानसारख्या आशियायी राष्ट्राला स्वतःची अर्थव्यवस्था मजबूत ठेवण्याकरिता अमेरिका जवळची वाटते. एकेकाळी ज्या साम्यवादाला अमेरिकेने कठोर विरोध केला तीच अमेरिका आज रशिया व चीन सारख्या साम्यवादी राष्ट्रांशी आर्थिक करार करू इच्छिते. युरोपातील राष्ट्रे जी आपल्या स्वतंत्र संस्कृतीचे वैशिष्ट्य जपत आली तीच राष्ट्रे आधुनिक काळात सामायिक बाजारपेठ स्थापून जवळ आली आहेत. अर्थनीतीची ही लवचिकता शिवाजीराजांनी सतराव्या शतकात राबविली होती. शिवाजी राजांना आंतरराष्ट्रीय कायद्याची उत्तम जाण होती. सर्व परकीय व्यापाऱ्यांचा उल्लेख टोपीकर असा राजे करीत असत. आपल्या राज्यात व्यापार वाढावा म्हणून सर्व परकीयांशी राजांनी सबुरीचे धोरण पत्करले होते.[26] शिवाजी राजांनी सुरतेच्या लुटीच्या वेळी कोणत्याही परकीय कंपनीला त्रास दिला नव्हता. इंग्रजांनी मराठ्यांच्या स्थानिक राजकारणात भाग घेणार नाही असे कबुल केले होते. पण जेव्हा विजापुरकरांचा हस्तक मुरूड जंजिऱ्याचा सिद्दी याने शिवाजी–राजांच्या पन्हाळगडाला वेढा घातला तेव्हा वखारवाले गुप्तपणे सिद्यीला मदत करीत असल्याचे शिवाजी–राजांच्या जेव्हा लक्षात आले तेव्हा त्यांनी दोन इंग्रजांना पकडले व राजापुरची वरवार केवळ लुटलीच नाही तर ती सर्व वरवार उद्ध्वस्त केली आणि इंग्रज व्यापाऱ्यांना सुमारे आठ महिने आपल्या कैदेत ठेवले.[27] इंग्रज व्यापारी जेव्हा सुटकेची याचना करू लागले तेव्हा दंडा–राजापुरी हे ठाणे सिद्यांकडून जिंकून घेण्यास मदत करीत असाल तरच सुटका होईल असे शिवाजीने सुनावले. शिवाजी राजांना परकीयांकडून शस्त्राचे व दारूगोळा यांची गरज होती, पण फिरंग्याची तलवार घेणे म्हणजे त्यांची गुलामगिरी स्वीकारणे नव्हे अशी शिवाजींची वृत्ती होती. अशी स्वाभीमानीवृत्ती आधुनिक राजनीतीत दाखविणे आज अनेक राष्ट्रांना शक्य होत नाही असे चित्र दिसते. मध्यपुर्वेतील इराकचा हुकूमशहा सद्याम हुसेन याने कुवेतवर हल्ला केला, अल्प संख्यांकावर अत्याचार केले तरी भारतासारखे राष्ट्र त्याचा उघडपणे निषेध करू शकले नाही, कारण पेट्रोलियम पदार्थाचा पुरवठा करणारे ते राष्ट्र आहे व आज प्रत्येक राष्ट्राची भौतिक प्रगती पेट्रोलियम पदार्थावर अवलंबून आहे असे दिसते.[28]

राजांनी व्यापाराच्या संदर्भात आणखी एक क्रांतिकारी गोष्ट केली ती म्हणजे राज्यभिषेकानंतर स्वतःची होन व शिवराई ही नाणी चलनात आणली स्वतःचे चलन निर्माण करणे याचाच अर्थ आपण सार्वभौम असल्याची द्वाही फिरविणे होय. मोठा राज्यविस्तार नसतांना देखील शिवाजी राजांनी स्वतःचे चलन चालू केले, हे तत्कालीन काळातील आव्हान स्वीकारण्यासारखे होते. इ.स. 1670 साली इंग्रजांनी मुंबईला आपली नाणी पाडायला सुरवात केली. आपण जेथे जाऊ तेथे ही नाणी रूढ व्हावी

हा कंपनीचा हेतू होता. जेथे जाऊ तेथे आपल्या गोष्टीचा प्रसार करण्याची इंग्रजांची ही नीती शिवाजीराजांनी ओळखली होती. इंग्रजांचा व राजांचा संबंध आल्यावर इंग्रजांची अशी इच्छा होती की त्यांची नाणी मराठी मुलखात चालावी. इ.स. 1674 साली राज्याभिषेकाच्या वेळी इंग्रजी प्रतिनिधी हेन्री ऑक्झिंडन रायगडावर व्यापार विषयक बोलणी करण्याकरीता आला होता. यावेळी राजांनी इंग्रजांना मराठी राज्यात व्यापाराला पुर्ण मोकळीक दिली, परंतु इंग्रजांची नाणी मराठी मुलुखात चालवण्याची अट राजांनी नामंजूर केली.[29] इंग्रजांना बंदरा व्यतिरीक्त इतरत्र जकाती शिवाय व्यापार करण्याची सवलत हवी होती तीही राजांनी दिली नाही. इंग्रजांची तीसरी मागणी अशी की वादळात सापडून फुटून किनाऱ्याला लागलेली एकमेकांची गलबते एकमेकांना परत द्यावी. ही मागणीही राजांनी नामंजूर केली. मोगली व अदिलशाही किनाऱ्यावर इंग्रजांनी ही सवलत जर कंपनीला दिली तर तीच सवलत पोर्तुगीज व फ्रेंचानाही द्यावी लागेल. याचा अर्थ राजांना या विषयीच्या आंतरराष्ट्रीय कायद्याची जाण होती.[30]

शिवाजी महाराजांच्या अर्थनीती व व्यापारनीतीचा अभ्यास करतांना  हे दिसून येते की तत्कालीन देशांतर्गत व्यापार, परदेशाशी होणारा व्यापार, चलनव्यवहार, व्यापार विषयक नियम व संकेत यासर्व गोष्टी राजांना अवगत होत्या. स्वदेशाच्या गरजा व हितसंबंधाना प्राधान्य देऊन, राजकारण सांभाळून परदेशांशी व्यापार करण्याचे कौशल्य शिवाजी राजांनी दाखवून दिले. सर्व आर्थिक व राजनितीक क्षमतांचा पुरेपुर वापर राजांनी वेळोवेळी केला म्हणूनच राजांना कल्याणकारी राजा म्हणून आजही गौरविले जाते.

**तळटीपा –**

1) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, चौथी आवृत्ती 1988, पॉप्यूलर प्रकाशन मुंबई; पृ.4.

2) कुलकर्णी अ.रा.; मध्ययुगीन महाराष्ट्र; डायमंड पब्लीकेशन पुणे 30; प्र.आवृत्ती 2007, पृ.7.

3) कुलकर्णी अ.रा.; कंपनी सरकार; प्रथम आवृत्ती 2000, राजहंस प्रकाशन पुणे 30; पृ.1.

4) देव डॉ. प्रभाकर, मराठ्यांचा इतिहास, विद्याप्रकाशन नागपूर 2; पृ.1.

5) कित्ता पृ.1.

6) कुलकर्णी अ.रा.; अशी होती शिवशाही; राजहंस प्रकाशन पुणे 30; तृतीय आवृत्ती 2004; पृ.50.

7) सावंत बी.एस.; जाधव व्ही.के; मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास; विद्या प्रकाशन, नागपूर, पृ.223.

8) कित्ता पृ. 224.

9) कित्ता पृ. 224.

10) कुलकर्णी अ.रा., संपादक आज्ञापत्र, पुणे 2004, पृ. 161.

11) कित्ता, पृ.163.

12) कुलकर्णी अ.रा., मध्ययुगीन महाराष्ट्र, पृ.18.

13) सरदेसाई गो.स., मराठी रियासत, खंड 1, नविन आवृत्ती 1988, पॉप्यूलर प्रकाशन ताडदेव मुंबई, 34; पृ. 391.

14) 'अशी होती शिवशाही,' पृ. 50.

15) 'कंपनी सरकार,' पृ. 18.

16) 'अशी होती शिवशाही,' पृ. 50.

17) 'मध्ययुगीन महाराष्ट्र,' पृ. 19.

18) 'मध्ययुगीन महाराष्ट्र,' पृ. 20.

19) 'अशी होती शिवशाही,' पृ. 54.

20) 'मध्ययुगीन महाराष्ट्र,' पृ. 20–21.

21) 'शिवचरित्र साहित्य,' खंड 9, ले. 55.

22) अशी होती शिवशाही, प. 65.

23) शिवचरित्र साहित्य, खंड 9, ले. 55, भा.इ.सं.मं. पुणे 1944.

24) 'अशी होती शिवशाही' – पृ. 65–66.

25) डॉ. सामंत एस.डी.; वेध महामानवाचा; चौथी आवृत्ती 2009; देशमुख आणि कंपनी प्रा.लि. सदाशिवपेठ, पुणे 30, पृ. 383.

26) 'कंपनी सरकार;' पृ. 14.

27) 'कंपनी सरकार,' पृ. 13

28) 'वेध महामानवाचा,' पृ. 384.

29) 'वेध महामानवाचा,' पृ. 386.

30) कित्ता.

**संदर्भ साधने**


| | | |
|---|---|---|
| 1) मराठी रियासत | गो.स. सरदेसाई | नविन आ. 1988 |
| 2) कंपनी सरकार | अ.रा. कुलकर्णी | प्रथम आ. 2000 |
| 3) वेध महामानवाचा | डॉ. श्रीनिवास सामंत | चतुर्थ आ. 2009 |
| 4) मराठ्यांचा प्रशासकीय सामाजिक व आर्थिक इतिहास | प्रा. सावंत बी.एस. प्रा. जाधव व्ही.के. | प्रथम आ. 1997 |
| 5) शिवचरित्रापासून आम्ही काय शिकावे | डॉ. जयसिंगराव पवार | प्रथम आ. 2005 |
| 6) मराठ्यांचा इतिहास | डॉ. प्रभाकर देव | प्रथम आ. |
| 7) शिवछत्रपती एक मागोवा | डॉ. जयसिंगराव पवार | प्रथम आ. 2005 |
| 8) अशी होती शिवशाही | अ.रा. कुलकर्णी | तृतीय आ. 2004 |
| 9) मध्ययुगीन महाराष्ट्र | अ.रा. कुलकर्णी | प्रथम आ. 2007 |
| 10) आज्ञापत्र | संपा. अ.रा. कुलकर्णी | आ. 2004 |
| 11) शिवचरित्र साहित्य खंड 9 | भा.र.सं.मं. 1944 | |
| 12) मराठ्यांच्या इतिहासाची साधने | वि.का. राजवाडे खंड 9 | |